# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

☎ ०२०- २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com

जा. क्र. : तंशिविकापु/विवि/ईबीसी/२०१७-१८/२०१७/ 2148 दिनांक : ०६/०६/२०१७

प्रति,
संचालक /प्राचार्य
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत व
खाजगी विनाअनुदानीत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था.

विषय - राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना २०१७-१८ व डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाहभत्ता योजना २०१७-१८.

संदर्भ — १. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/प्र क्र ५०१/तांशि-४ दिनांक १३/१०/२०१६.

२. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/प्र क्र ५५९/तांशि-४ दिनांक १५/०४/२०१७.

३. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/प्र क्र २०१९/तांशि-४ दिनांक ३१/०३/२०१६.

विषयांकीत दोन शासन योजनांचा विद्यार्थ्यांना लाभ देण्यसासाठी या विभागाच्या अधिनस्त संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून उपरोक्त योजनेतंर्गत करण्यात येणारी प्रतिपूर्ती संबंधीत महाविद्यालय / तंत्रनिकेतने यांना करण्याऐवजी पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती स्वरुपात थेट त्यांच्या आधार संलग्नीत बँक खात्यावर जमा करण्यात येणार आहे.

वरील दोन्ही योजनांसदर्भात संदर्भ क्र १ येथील शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अन्य सर्व अटी, शर्ती व निकष हे दोन्ही योजनांकरीता कायम राहतील तसेच या योजनेचा लाभ घेणा-या सर्व महाविद्यालय / तंत्रनिकेतनांना सदर योजनेअंतर्गत समाविष्ठ होण्यासाठी संस्थेतील प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांची दैनंदीन उपस्थिती पारदर्शीपणे नोंदविणे आवश्यक आहे. यासाठी संबंधीत महाविद्यालय / तंत्रनिकेतने यांनी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून आधार संलग्नीत बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणाली स्थापीत करणे बंधनकारक आहे. उपरोक्त दोन्ही योजनांचा लाभ घेण्यासाठी संबधीत शैक्षणिक वर्षात इच्छुक अर्जदार विद्यार्थ्यांची प्रवेशीत अभ्यासक्रमासाठी किमान ५० टक्के उपस्थिती आधार संलग्नीत बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीवर विद्यार्थ्यांनी नोंदविणे आवश्यक आहे व विद्यापीठ /एआयसीटीई यांच्या प्रचलित नियमानुसार त्यांनी परीक्षांसारख्या अन्य विविध प्रयोजनार्थ विहीत केलेल्या उपस्थितीच्या प्रमाणाची स्वतंत्रपणे सर्व संबंधीत विद्यार्थ्यांनी पूर्तता करणे आवश्यक आहे.

शासकीय ... महाविद्यालय,
3541
19 JUN 2017

या प्रयोजनार्थ महाविद्यालय / तंत्रनिकेतने यांनी ऑक्टोबर २०१७ पर्यत स्वखर्चाने आधारे संलग्नीत बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणाली त्यांचे परिसरात स्थापित करणे बंधनकारक आहे.

**तसेच संदर्भ क्र ३ मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयानुसार या योजनांतर्गत पात्र असणा-या प्रवेशित विद्यार्थ्यांना सदर योजनांचा लाभ मिळणेसाठी व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या संबधीत शैक्षणिक संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यत सक्षम शिखर संस्थेकडून मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करणे आवश्यक आहे अन्यथा या संस्था शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून उपरोक्त शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहतील. आता लवकरच शैक्षणिक वर्ष २०१७-१८ सुरु होत आहे. त्यामुळे आपल्या शैक्षणिक संस्थेचे मुल्यांकन करुन घेण्यासाठी २ वर्षाचा कालावधी शिल्लक आहे. या दोन वर्षाचे कालावधीत आपल्या संस्थेचे मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करुन घेण्याची जाणीव सर्व संस्थांना या पत्राव्दारे करुन देण्यात येत आहे.**

सोबत - संदर्भिय शासन निर्णयाच्या प्रती

(डॉ. दि.रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत - मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांना माहितीस्तव सादर **(लक्षवेध कार्यसन क्र. १८)**